# राजकारणात वाढत जाणारे गुन्हेगारीकरण

**प्रा. सौरभ संजय तेलगोटे**
सहाय्यक प्राध्यापक
श्री शिवाजी कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय
अकोला

---

**प्रस्तावना :**

व्यक्तीच्या दैनंदिन जीवनावर राजकीय निर्णयाचा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष प्रभाव आपल्याला पाहायला मिळतो. यामुळे राजकीय निर्णय घेणारे हे किती निष्णात आणि प्रगल्भ असायला पाहिजे ह्याच गांभीर्य आपल्याला कळते कारण लोकशाहीत जनतेचा आनंद हा शासनाच्या निर्णयावर ठरत असतो. त्यामुळे या शोधनिबंधात हे समजून घेऊ की चांगला आणि वाईट निर्णय हा चांगल्या किंवा वाईट व्यक्तीवर अवलंबून असतो.

**शोधनिबंधाचे उद्दिष्ट :**

१) राजकारणात गुन्हेगारीकरणाचे नेमके कारण काय?
२) राजकारण आणि समाज याचा संबंध समजून घेणे.
३) राजकारण आणि गुन्हेगार यांचा संबंध समजणे.
४) नेत्यांची अपराधिक गुन्ह्याची संख्या समजणे.

**राजकारण म्हणजे नेमकं काय ?**

राजकारण ही निरंतर गतिमान आणि वैश्विक अशी क्रिया आहे आणि प्रामुख्याने समस्याचे समाधान करताना होणाऱ्या निर्णय निर्धारण प्रक्रियेमध्ये तिचे अवतरण होते. मानवाच्या विशिष्ट वर्तनातून याचा उगम होतो राजकारणाच्या ज्या वेगवेगळ्या व्याख्या आहे त्यामध्ये मला डेव्हिड इस्टन ची व्याख्या खूप समर्पक वाटते . "राजकारण म्हणजे समाजासाठी अधिकारात्मक (authoritative)मूल्यांचे वाटप करणे." याचा अर्थ असा की समाजामध्ये उपलब्ध असलेल्या संसाधनांचे (उदा. पैसा, जमीन अधिकार )वाटप करण्याची अंतिम जबाबदारी राजकारणाची असते. ही राजकारणाची औपचारिक व्याख्या पाहायला मिळते परंतु जर आपण खोलवर जाऊन राजकारणाचा विचार केला तर राजकारणाचा संबंध हा फक्त राजकीय कृती करून सत्ता मिळवण्या पुरता मर्यादित राहिला नाही आहे. तर मानवी जीवनातील प्रत्येक क्षेत्र यामध्ये समाविष्ट होताना आपल्याला दिसते ज्या ज्या ठिकाणी दोन पेक्षा जास्त लोक एकत्रित येत असतील असे कोणतेही ठिकाण तिथे आपल्याला राजकारण पाहायला मिळते. मग हे छोट्याशा ऑफिस पासून तर संसदेपर्यंत अशा पद्धतीने राजकारणाचा व्यापक अर्थ आपल्याला येतो.

**गुन्हेगार आणि राजकारण :**

राजकारणाच्या अर्थावरून आपल्याला एक बाब समजली ती ही सत्ताप्राप्तीसाठी जी कृती केली जाते त्या सर्व कृती राजकारणात येतात. आणि सत्ता ही नेहमी कुणावर तरी गाजवावी लागते ती कधीच एकट्या व्यक्तीची

Research Hub International Journal

त्याच्या स्वतःवर नसते. आता सत्ता प्राप्तीची वेगवेगळी साधने आहेत समस्या खऱ्या अर्थाने इथेच आपल्याला जाणवते लोकशाहीमध्ये सत्तेत यायचं असेल तर लोकांच्या मनावर राज्य गाजवावे लागणार. परंतु इथे सुद्धा स्पर्धा आहे जोपर्यंत येथे स्पर्धा ही वैधानिक मार्गाने आहे तोपर्यंत सर्व ठीक आहे जेव्हा या स्पर्धेत हिंसेचा व पैशाचा प्रभाव वाढतो तेव्हा राजकारणाचे गुन्हेगारीकरण खऱ्या अर्थाने वाढते आणि आपल्याला समजण्यासारखी बाब म्हणजे ही स्पर्धा दिवसेंदिवस अधिक हिंसक होताना दिसते त्यांच्या मागचं मूळ कारण हे राजकारणी हिंसक प्रवृत्तीची आहेत किंवा ते मुळात भ्रष्ट आहेत असे नाही तर इथे समजण्यासारखी बाब ही आहे की राजकारणी हे समाजाचा भाग आहेत आणि समाजात गुन्हेगारी प्रवृत्ती वाढत आहे याचे प्रतिबिंब आपल्याला राजकारणात दिसते राजकारणी हे परग्रहावरून आलेले नाहीत तर ते याच समाजाचा भाग आहेत जर संपूर्ण समाजाने गुन्हेगारी प्रवृत्ती असलेल्या राजकारण्यांना नाकारले तर आपोआपच राजकारणात वाढत जाणारे गुन्हेगारी प्रवृत्ती असणारे लोक कमी होतील परंतु असं होताना दिसत नाही. ह्या लोकांना समाजाकडून बराच मानसन्मान मिळतो समाज माध्यमांवर असतात त्यांचे लाखाने फॉलोवर्स असतात .समाजातील आप - आपसातील भांडण मिटवण्यासाठी गुन्हेगारी प्रवृत्ती असणाऱ्या लोकांकडे समाज मध्यस्थ म्हणून पाहतो आणि ह्याच्याकडे आपले वाद सोडवण्यासाठी घेऊन जातो लग्न समारंभ महत्त्वाचे कार्यक्रम ह्या सर्वांमध्ये ह्या लोकांना आवर्जून आमंत्रित केले जाते एवढं सर्व मानसन्मान ह्या लोकांना समाजाकडून मिळत असेल तर राजकीय पक्षांना काय पाहिजे ?जनतेचे समर्थन आणि जनतेचे समर्थन हे गुन्हेगारी प्रवृत्ती असणाऱ्या व्यक्तीकडे असेल तर सर्व राजकीय पक्ष सत्तेमध्ये येण्यासाठी अशा लोकांना संधी देतात. जेव्हा अशा सर्व व्यक्तींना राजकीय पक्ष राजकीय मैदानात उतरवतात तेव्हा आपोआपच राजकीय स्पर्धा ही हिंसक होऊन जाते नंतर ह्या मधील काही लोक निवडून येऊन संसदेत आणि विधानसभेत बसतात. ADR 2025 च्या रिपोर्ट नुसार संपूर्ण देशातील 302 मंत्र्यांपैकी 47% मंत्र्यांवर गुन्हेगारी खटले दाखल आहेत यापैकी 174 मंत्र्यांवर गंभीर गुन्हे दाखल आहेत यामध्ये हत्या,अपहरण, महिला संबंधित गुन्हे. राज्यानुसार स्थिती पाहिली तर 11 राज्यांमध्ये 60% पेक्षा जास्त मंत्रावर अपराधी गुन्हे दाखल आहे यामध्ये आर्थिक दृष्ट्या सुदृढ राज्याचा सहभाग होतो आंध्र प्रदेश ,तामिळनाडू, बिहार, महाराष्ट्र ,कर्नाटक, पंजाब, तेलंगणा, हिमाचल, दिल्ली, पॉंडिचेरी, ही गोष्ट काय दर्शवतआहे? की एक यशस्वी राजनेता बनण्यासाठी गुन्हेगार असणे हे अप्रत्यक्ष अट तर ठरत नाही आहे ना? मी असं का म्हणत आहे कारण देशातील 512 महिला MP /MLA पैकी 143 महिलांवर अपराधीक गुन्हे दाखल आहे यामध्ये 78 महिलांवर गंभीर गुन्हे दाखल आहेत. म्हणजे राजकारणी कोणीही असो त्यावर गुन्हे असणे आणि समाजाने त्यांना मान्यता देणे हे अप्रत्यक्ष अट झाली आहे .राजकारण हे समाज हितासाठी करायला पाहिजे ही बाब आता कुठेतरी आता मागे पडताना आपल्याला दिसत आहे खरं म्हणजे ह्या बाबतीत पूर्णतः दोष आपण गुन्हेगारी प्रवृत्ती असणाऱ्या लोकांना देऊ शकत नाही . बुद्धिजीवी लोकांनी ह्याकडे दुर्लक्ष केल आहे. त्यामुळे गुन्हेगारी प्रवृत्ती असणारे लोक राजकारणात मोठ्या प्रमाणात येत आहेत एखाद्या ठिकाणी वाईट लोकांना रोखायचे असेल. तर चांगल्या लोकांनी त्या ठिकाणी गेलं पाहिजे जोपर्यंत बुद्धिजीवी समाज राजकारणाला नकारात्मक दृष्टीने पाहत असेल तोपर्यंत त्यांना राजकारणात गुन्हेगारी प्रवृत्ती वाढली आहे हे म्हणण्याचा अधिकार नाही . एक यशस्वी गुंडा तेव्हा होतो जेव्हा तो एक यशस्वी राजनेता होतो ही खूप गंभीर बाब भारतीय समाजासाठी आहे आकडेवारीचा विचार केला तर देशाच्या भविष्यासोबत आपण खेळत आहोत. असेच निदर्शनास येईल कारण लोकशाही प्रणालीत एखाद्या देशाचे भविष्य काय असेल हे त्या देशातील वर्तमान सरकारच्या निर्णयावरून ठरत असते म्हणून शासन करते हे निर्दोष आणि उच्च व्यक्तिमत्वाचे असणे आवश्यक आहे आणि हे तेव्हाच होईल जेव्हा भारतीय समाज

Research Hub International Journal

अशा गुन्हेगारी प्रवृत्ती असणाऱ्या लोकांना सन्मान देणे थांबवणार .

**निष्कर्ष :**

१) जोपर्यंत समाजातील गुन्हेगारी कमी होत नाही तोपर्यंत राजकारणातली गुन्हेगारी कमी होत नाही.

२) समाजाने गुन्हेगारांना मान सन्मान देणे बंद करावा.

३) सत्ता ही व्यक्तीला भ्रष्ट बनवते आणि ह्यामध्ये स्त्री-पुरुष असा कोणताही भेद नाही.

**संदर्भ :**

- १)ADR report 2025

Research Hub International Journal